# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/02/2024 (शनिवार) सकाळ


---

### व्हिडीओ गेमींग पार्लरवर धाड
### पोलीस स्टेशन MIDC बुट्टीबोरी यांचे पथकाची धडक कारवाई एकुण ७९,४००/— रू. चा माल जप्त.

गुप्त बातमिदाराकडुन खबर मिळाली की, मौजा टेंभरी येथील महाकाल ट्रेडर्स बिल्डींग मटेरीयल येथील दुकानाचे बाजुला असलेल्या एका शटर दुकानामध्ये हनुमंत सोनोने हा व्हिडीओ गेम पार्लर मधील इलेक्ट्रॉनीक मशिनवर त्याचे फिरत्या आकड्याचे आधारे तेथे येणाऱ्या ग्राहकांकडून नगदी पैसे रक्कम स्विकारून त्या मोबदल्यात त्यांना तेवढ्या रकमेची चाबी भरून देवुन स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता पैज लावून हारजितचा जुगार खेळीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरुन पोलीस पथकाने टेंभरी चौकालगत असलेल्या नमुद ठिकाणी छापा जुगार कायद्यान्वये रेड करुन कारवाई केली ती पुढीलप्रमाणे.

नमुद ठिकाणी रेड दरम्यान आरोपी हनुमंत आनंदराव सोनोने, वय ४४ वर्षे, रा. शुभम लाकडे यांचे घरी किरायाने टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर हा दुकानात आलेले ग्राहक आरोपी सुशिल गजानन भजभुजे, वय २५ वर्षे, रा. वार्ड नं. ०३ टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर तसेच अमोल कवडुजी उईके वय २६ वर्षे रा. झेंडा चौक, वायगांव गोंड रोड सुमुद्रपुर ता. समुद्रपुर जि. वर्धा यांचेकडुन पैसे स्वीकारुन दुकानात असलेल्या इलेक्ट्रीक मशिनच्या सहाय्याने चावी फिरवुन हार जितचा जुगार खेळताना मिळुन आला. त्यानंतर पंचनामा कारवाई करुन सदर शटरच्या दुकानातुन वेगवेगळया कंपनीच्या ०६ ईलेक्ट्रॉनीक मशिन, त्यांच्या चाब्या व जुगारचे नगदी १४००/— रू. असा एकुण जुगार कि. ७९,४००/— रू. चा माल जप्त करण्यात आला. दरम्यान सदर प्रकरणी अधिक चौकशी केली असता सदरच्या व्हिडीओ पार्लरचे मालक हे शुभम जगदीश चचाने रा. टेंभरी व बाबु शेख रा. बुटीबोरी असल्याचे निष्पन्न झाले. सदर प्रकरणी आरोपी हनुमंत आनंदराव सोनोने, वय ४४ वर्षे, रा.शुभम लाकडे यांचे घरी किरायाने टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर, सुशिल गजानन भजभुजे, वय २५ वर्षे, रा. वार्ड नं. ०३ टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर, अमोल कवडुजी उईके वय २६ वर्षे रा. झेंडा चौक, वायगांव गोंड रोड सुमुद्रपुर ता. समुद्रपुर जि. वर्धा, व्हिडीओ पार्लरचे मालक हे शुभम जगदीश चचाने रा. टेंभरी व बाबु शेख रा. बुटीबोरी या सर्वांविरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम तसेच भारतीय दंड संहितेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शात ठाणेदार सहा. पोनि राजीव कर्मलवार, सहा. पोनि भुजबळ, पोलीस उप निरीक्षक खोत तसेच पोलीस अंमलदार विनोद अहिरकर, विनायक सातव, श्रीकांत गौरकार यांनी केली.




## नागपूर ग्रामीण जिल्हयात नाकाबंदी दरम्यान वाहनांची तपासणी

नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या आदेशाने संपुर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०९/०२/२०२४ रोजी रात्री दरम्यान जिल्हयातील ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील एकुण २२ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. या दरम्यान दुचाकी तसेच चारचाकी वाहने चेक करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान एकुण ७०३ वाहनांची तपासणी करण्यात आली असुन ट्रिपलसिट तसेच दुचाकी वाहनांसह वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांना अडवले जात होते. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या एकुण ६२ वाहन चालकांवर मोटार वाहन कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच १५ मद्यपी वाहन चालकावर ड्रक अॅंड ड्राईव्ह अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर